Mahatma Gandhi Shikshan Mandalache

# Dadasaheb Dr. Suresh G. Patil College

Chopda, Dist: Jalgaon, P.B. No. 14. Pin-425107

(Formerly MGSM'S Arts, Science and Commerce College, Chopda)

Affiliated to Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

NAAC Re-Accredited 'A+' Grade (CGPA:3.31) | Awarded 'Best College' by Affiliating University (2018-19) | DST-FIST College

Dr. D. A. Suryawanshi, Principal

mgtsm_asc@yahoo.com (02586) 220140 / 222240, 220174 (R), 220984 (Fax) www.mgsmasc.ac.in

## *7.1.9 Sensitization of students and employees of the Institution to the constitutional obligations: values, rights, duties and responsibilities of citizens.*

### Democratic Week (26 Jan to 10 Feb)




### Constitution Day (26 Nov)





Voter Awareness Program in collaboration with district election commission

# मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी सामूहिक प्रयत्न करा-डॉ.सोनवणे

चोपडा- येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित, कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना युनिट, विद्यार्थी विकास विभाग व निवडणूक शाखा, चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने २५ जानेवारी २०१९ रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.ए.सूर्यवंशी अध्यक्ष म्हणून लाभले, याप्रसंगी प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणून डॉ. स्वप्निल सोनवणे (नायब तहसिलदार, निवडणूक शाखा, चोपडा) हे उपस्थित होते. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.प्रा.ए.एल.चौधरी, उपप्राचार्य श्री.एम.बी.हांडे, उपप्राचार्य डॉ.के.एन.सोनवणे, श्री.डी.पी.सपकाळे, श्री.डी.डी.कर्दपवार हे व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन दिपप्रज्वलन करून करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.डी.डी.कर्दपवार यांनी केले. यानंतर श्री.बी.बी.पवार यांनी मतदार प्रतिज्ञेचे सामूहिक वाचन केले.

याप्रसंगी महाविद्यालयात दि.२१/०१/२०१९ रोजी राज्यशास्त्र विभागाकडून घेतलेल्या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना नायब तहसिलदार व मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक सोनवणे धनश्री ललितकुमार (एस.वाय.बी.एस्सी.), व्दितीय क्रमांक पाटील अंकिता शांताराम (एस.वाय.बी.एस्सी.), तृतीय क्रमांक पाटील राहुल अरुण (एस.वाय.बी.ए.) यांनी प्राप्त केले. तसेच पोस्टर प्रदर्शनात अनुक्रमे प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक अग्रवाल नम्रता गोपाल (एस.वाय.बी.एस्सी.), पाटील मृणाली महेंद्र (एस.वाय.बी.एस्सी.), कणखरे चैताली खुशाल (एस.वाय.बी.एस्सी.) तर वक्तृत्व स्पर्धेत अनुक्रमे प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक काविरे छाया लक्ष्मण (टी.वाय.बी.ए.), शिंपी हर्षल दगडू (एफ.वाय.बी.ए.), निकम रोहिणी महेंद्र (एफ.वाय.बी.ए.) तसेच उत्कृष्ट बी.एल.ओ. म्हणून मो.उस्मान हमीद अली, युवराज आधार पाटील, रूपाली राजेंद्र पाटील, गायत्री शिवराम पाटील व प्रशासकीय कामात सहकार्य केल्याबाबत राजू हैदर तडवी, भगवान भायलाल बारडे, दिपक सुरेश महाले, रविंद्र वाघ यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच पंकज वरिष्ठ महाविद्यालयातील विविध स्पर्धांमधील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी डॉ.स्वप्निल सोनवणे (नायब तहसिलदार, निवडणूक शाखा,चोपडा) यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व सांगून, लोकशाही बळकटीसाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करावे तसेच मतदार व भावी मतदार यांनी नि:पक्षपातीपणे, निर्भीडपणे मतदान प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी सामूहिक प्रयत्न करावे असे आवाहन केले.त्यानंतर महाविद्यालयाचे



प्राचार्य डॉ.डी.ए.सूर्यवंशी यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त मतदानाचे महत्त्व आणि नागरिकांचे कर्तव्य यावर विचार प्रकट केले, कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदान करावे. लोकशाही मूल्य स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता या विषयी आपले विचार व्यक्त केले तसेच महाविद्यालयातील विविध स्पर्धांमधील यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच प्रसंगी मा.सुनील अरोडा (मुख्य निवडणूक आयुक्त) यांनी दिलेला संदेश चित्रफितीव्दारे दाखविण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.बी.बी.पवार यांनी केले तर श्री.डी.पी.सपकाळे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना युनिट, श्री.व्ही.पी.हौसे (विद्यार्थी विकास विभाग), श्री.एम.जी.पाटील, सौ.एम.टी.शिंदे, श्री.ए.बी.सूर्यवंशी, डॉ.शैलेश वाघ श्री.एम.एल.भुसारे डॉ.आर.आर.पाटील, श्री.व्ही.बी.पाटील, राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थी व तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाला प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर वृंद व मोठ्यासंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

Workshop on legal awareness in association with BAR association of Chopda



## Mock Parliament organized by ABP news and Yuvak Biradari at Nashik Maharashtra



चोपडा येथील कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा गौरव करताना कुलगुरु डॉ. इ. वायूनंदन. सोबत इतर मान्यवर.

# 'युवा संसद' स्पर्धेत चोपडा महाविद्यालय प्रथम

## 'जातपात मुक्त भारत २०४७' वर सादरीकरण : उत्तर महाराष्ट्रातून तीन संघ सहभागी

लोकमत न्यूज नेटवर्क

**चोपडा :** यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे युवक बिरादरी (भारत) व खाजगी वृत्वाहिनी यांच्यावतीने आयोजित 'युवा संसद' स्पर्धेत महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळविला.

या स्पर्धेत उत्तर महाराष्ट्र विभागातून धुळे, मनमाड, चोपडा या महाविद्यालयातील स्पर्धक संघ सहभागी झाले होते. स्पर्धेत चोपडा येथील कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालयाचे विद्यार्थी दिपाली काविरे, अनिकेत धनगर, लक्ष्मण पाटील, विश्वनाथ चौधरी, छाया कविरे, विशाल धनगर, केदारनाथ धनगर, साक्षी वाणी, राजश्री पाटील, दीपक पाटील, भूषण सोनवणे, हर्षल शिंपी, प्राची पालिवाल, जयश्री पवार, वर्षा जाधव, डिगंबर धनगर, विपुल बाविस्कर, योगेश कोळी, विशाल चव्हाण, नरेंद्र सोनवणे, राहुल पाटील असे एकूण २१ विद्यार्थी सहभागी झाले होते.

चोपडा कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालयाच्या संघाला 'जातपात मुक्त भारत २०४७' या विषयावर सादरीकरण करीत उत्कृष्ट वक्तृत्व, उत्कृष्ट सादरीकरणासाठीचे प्रथम क्रमांक पारितोषिक यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इ. वायूनंदन यांच्याहस्ते देण्यात आले. संघाचे प्रतिनिधित्व समन्वयक डी.डी. कर्दपवार यांनी केले. संस्थापक अध्यक्ष डॉ.सुरेश जी. पाटील, संस्थेचे अध्यक्ष अॅड. संदीप पाटील, संस्थेच्या सचिव डॉ.स्मिता पाटील, उपाध्यक्षा आशा पाटील यांनी कौतुक केले. यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ.डी.ए. सूर्यवंशी, उपप्राचार्य डॉ.ए.एल. चौधरी, एम.बी.हांडे, डॉ. के.एन. सोनवणे तसेच संस्था व महाविद्यालय यांचे सहकार्य लाभले.

### महाविद्यालयाला दोन पारितोषिके

प्रथम वर्षाच्या केदारनाथ धनगर या विद्यार्थ्याला उत्कृष्ट विधेयक सादरीकरणासाठी 'उत्कृष्ट संसद पटू' म्हणून २,००० रुपये रोख आणि प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले आहे. महाविद्यालयाने या स्पर्धेत सादरीकरण प्रथम क्रमांक व उत्कृष्ट संसदपटू अशी दोन पारितोषिके प्राप्त केले.

## Visit to local bodies like "Panchayat Samiti", "Municipal Corporation"






# राज्यशास्त्र विभागातर्फे विद्यार्थ्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजाची माहिती

चोपडा– येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय, चोपडा येथील राज्यशास्त्र विभागातर्फे विद्यार्थ्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजाची प्रत्यक्ष माहिती देण्यासाठी शासनपत्रानुसार पंचायत समिती व नगरपालिका या संस्थांना भेटी देण्यात आल्या.

पंचायत समिती येथे गटविकास अधिकारी श्री. बी.एस. कोसोदे यांनी पंचायतराज व्यवस्थेतील त्रिस्तरीय रचनेविषयी माहिती सांगितली. यात ७३ व्या घटनादुरूस्तीनुसार ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वायत्तता व जिल्हापरिषदेचे मुख्यकार्यकारि अधिकारि व अध्यक्ष यांची निवड, कार्य व धोरणनिर्मिती व धोरणांची अंमलबजावणी तसेच पंचायत समिती व ग्रामपंचायत येथील प्रशासकीय अधिकारि त्यांची निवड, कार्य व धोरण निर्मिती व अंमलबजावणी या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे श्री. बी.एस.



कोसोदे गटविकास अधिकारी यांनी दिली. त्याचबरोबर शासकीय योजनांची माहिती, त्यासाठी लागणारा निधी व त्यांची अंमलबजावणी याविषयी मार्गदर्शन केले. तसेच जितेंद्र महाजन यांनी ग्राम स्वच्छता, प्रधानमंत्री घरकुल योजना यासंदर्भात माहिती दिली.

तसेच चोपडा नगर परिषद येथे श्री दिपक गिरासे प्रभारी मुख्याधिकारी तथा तहसिलदार, चोपडा तहसील यांनी नगर परिषदचे कामकाज, धोरण निर्मिती व अंमलबजावणी या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ७४ व्या घटनादुरूस्तीनुसार शहरी भागातील महानगर पालिका व नगर पालिका यामधील आरक्षण, निवडणुका, निवड पद्धती, मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्याधिकारी यांचे कार्य व जबाबदारी यावर मार्गदर्शन केले तसेच लोकशाही, निवडणुका, सुशासन व कल्याणकारी योजना याबाबत माहिती दिली व स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी कठोर परिश्रमाची आवश्यकता आहे असे सांगितले.

स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रभेटी प्रसंगी प्रथम वर्ष कला या वर्गातील विद्यार्थी सहभागी झाले होते तसेच या क्षेत्रभेटीचे नियोजन श्री. डी. डी. कर्दपवार, श्री. बी. बी. पवार यांनी केले. याकरिता एन. एन. एस विभाग, विद्यार्थी विकास विभाग यांचे सहकार्य लाभले. श्री. व्ही. बी. पाटील, श्री. डि. पी. सपकाळे, श्री. ए.बी. सूर्यवंशी, श्री.व्ही. पी. हौसे, श्री.एम.एल.भुसारे, डॉ. आर. आर. पाटील, श्री.डी. जी. चौधरी व राज्यशास्त्र विभागातील एम.ए. च्या विद्यार्थी यांनी यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले

**Responsibility and Secure use of internet and social media sites workshop in collaboration with cyber cell of Jalgaon Police**




**Promotional Program on Organ Donation**




दुपारी ३ ते ४ मा. डॉ. अयुब पिंजारी, चोपडा यांचे 'अवयव दान आणि अंधश्रध्दा' या विषयावर व्याख्यान झाले. त्यांनी अंधश्रध्दा विषयक विविध कौशल्यपूर्ण प्रयोग सादर करून अवयवदान संबंधी विद्यार्थी व ग्रामस्थांचे मनातील गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न यशस्वी केला.

Awareness Program for cashless economy in rural area



# चोगावला कॅशलेस व्यवहाराबाबत जनजागृती

## चोपडा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात उपक्रम

Awareness Program for govt. scheme for rural development



# शासनाच्या योजना ९५ टक्के लोकांना माहितच नाहीत

